
Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL
MULTIDISCIPLINARY
QUARTERLY
RESEARCH JOURNAL



# AJANTA

Volume - X, Issue - I,
January - March - 2021
Marathi / Hindi

Impact Factor / Indexing
2019 - 6.399
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

# CONTENTS OF MARATHI



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २५ | शेतीची भुमिका व आत्मनिर्भर भारत योजनेद्वारे शेती संबंधित केलेल्या तरतुदी<br>**मारुती भिमराव कांबळे**<br>**डॉ. मिनाक्षी जाधव** | १२०-१२४ |
| २६ | कोरोना कालखंडातील स्त्री-पुरुषांमधील ताण-तणावातील फरक अभ्यासणे व त्यांना आत्मनिर्भर बनविण्यासाठी उपाययोजना सुचविणे<br>**अडसरे विष्णू बाळशिराम** | १२५-१२७ |
| २७ | महात्मा गांधी यांची ग्राम स्वराज्य संकल्पना आणि आत्मनिर्भर भारत<br>**प्रा. सांगळे भाऊसाहेब खंडू** | १२८-१३० |
| २८ | आत्मनिर्भर भारत या संकल्पनेसंबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टीकोनातून लावलेला अन्वयार्थ एक अभ्यास<br>**विजयकुमार वावळे** | १३१-१३४ |
| २९ | आत्मनिर्भर भारत, वस्तुस्थिती, संधी आणि आव्हाने<br>**प्रा. डॉ. सीमा चव्हाण**<br>**विकास गोधाजी अंत्रे** | १३५-१४१ |

# २७. महात्मा गांधी यांची ग्राम स्वराज्य संकल्पना आणि आत्मनिर्भर भारत

प्रा. सांगळे भाऊसाहेब खंडू
सहयोगी प्राध्यापक व विभागप्रमुख, इतिहास विभाग, अण्णासाहेब आवटे कॉलेज, मंचर, पुणे.

**प्रस्तावना**

१९९१ साली भारतामध्ये जागतिकीकरणाच्या रेट्याखाली अंतर्गत बाजारपेठेचे दरवाजे जगातील सर्व देशांसाठी खुले करण्यात आले. त्याचे मोठे परिणाम गेल्या २५ वर्षात भारताच्या अर्थव्यवस्थेवर पडले यात शंका नाही. जगातील आधुनिक आर्थिक धोरणांमध्ये संस्कृती आणि मानवी नाती यांचा विचार करण्यात आलेला नाही.प्रत्येक देशाला सोयीचे होईल असे आर्थिक धोरण स्वीकारणे त्या देशासाठी आवश्यक असते.याच पार्श्वभूमीवर भारतामध्ये 'आत्मनिर्भर भारत' ही योजना मे २०२० मध्ये सुरू करण्यात आली.यामध्ये पंतप्रधानांनी

'Vocal for Local` अर्थात स्वदेशी या संकल्पनेचा पुरस्कार केला.प्रत्येक भारतीयाने भारतीय उत्पादित वस्तु-सेवा अशांचा आग्रह धरला पाहिजे.सर्वप्रथम आपल्या गावातील उत्पादित वस्तूंच्या खरेदीचा आग्रह धरणे,गावामध्ये उत्पादित वस्तु उपलब्ध नसेल तर तालुका,जिल्हा,राज्य व देश या अंतर्गत वस्तूच्या खरेदीचा आग्रह धरावा. प्रस्तुत संशोधन लेखामध्ये आत्मनिर्भर भारत योजनेचे मूळ किंवा या योजनेचा मुख्य विचार हा गांधीजींच्या 'ग्राम स्वराज्य' संकल्पनेवर आधारित आहे, असा अभ्यास ऐतिहासिक दृष्टिकोनातून करण्याचा प्रयत्न झाला आहे.

**उद्देश**

1. आत्मनिर्भर भारत या योजनेचा अभ्यास करणे.
2. महात्मा गांधीजीच्या विचारांची प्रासंगिकता अभ्यासणे

**महात्मा गांधी यांची ग्रामस्वराज्य संकल्पना**

महात्मा गांधीजींच्या गावांचे स्वराज्य या संकल्पनेत कोणत्याही धोरण निर्मितीमध्ये त्याचा परिणाम होणाऱ्या प्रत्येक घटकाला सामावून घेण्याविषयी विचार मांडले आहेत. त्यांची ही संकल्पना समकालीन ग्रामीण भारतात सामाजिक-राजकीय बदलाचे माध्यम बनू शकते. गांधीजींच्या विचारानुसार स्वराज्याचा अर्थ स्व-राज्य आणि आत्म-संयम आहे. मात्र सर्व प्रकारच्या बंधनातून मुक्ति किंवा संयमाला कायमची तिलांजली असा अर्थ मुळीच नाही. केवळ काही लोकांनाच अधिकार मिळाल्यास अशा प्रकारचे स्वराज्य येऊ शकत नाही, असे गांधीजींचे म्हणणे होते. अशा प्रकारचे स्वराज्य येण्यासाठी जनतेला आणि त्यातील प्रत्येक व्यक्तीने सशक्त होणे आवश्यक आहे,कारण भारताचा आत्मा गावांमध्ये आहे, अशी त्यांची धारणा होती.१९४२ होती.१९४२ मध्ये लिहलेल्या एका लेखामध्ये त्यांनी, असे लिहले की, आर्थिक आणि राजकीय ताकद एका

ठिकाणी जमा झाल्यास स्वराज्याच्या पायाभूत सिद्धांताच्या उल्लाघंनाचा धोका आहे.गावे सशक्त होऊन आर्थिक आणि राजकीय ताकदीचे केंद्रीकरण केल्यास हे सिद्धान्त राखले जातील. गांधीजींची ग्रामस्वराज्याची संकल्पना स्पष्ट करताना खालील मुद्यांचा विचार करता येईल.

1. प्राथमिक गरजांबाबत स्वावलंबित्व

भारताच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीकोणातून ग्रामस्वराज्य गांधीजीच्या विचारांच्या केंद्रस्थानी होते.केवळ जुन्या गावांचे पुनर्निर्माण करणे इतकेच नाही तर, प्राथमिक गरजा गावांमध्येच पूर्ण झाल्या पाहिजेत. कपडे, अन्न, आणि इतर प्राथमिक गरजा भागविण्यासाठी आवश्यक उत्पादने गावातच तयार झाली पाहिजेत. यामुळे गावामध्ये सर्वांना रोजगार मिळेल आणि चांगल्या संधीच्या शोधात गावातून शहरांकडे होणारे स्थलांतरही थांबेल.

प्रा. भारती पाटील यांनी, "गांधीजींची ग्रामस्वराज्य संकल्पना राज्यकर्त्यांनी आणावी. (४ फेब्रुवारी २०१९) या आपल्या भाषणात म्हटले आहे की, महात्मा गांधी यांची ग्रामविकासाची संकल्पना राज्यकर्त्यांनी अस्तित्वात आणावी.

2. ग्रामोद्योग

ग्रामोद्योगाच्या बाबतीत गांधीजी असा विचार करत होते की, प्राचीन भारतामध्ये खेडे आर्थिकदृष्ट्या संपन्न होते. मात्र औद्योगिकरणामुळे गावातील लघुउद्योग, कुटीर उद्योग यांचा -हास झाला.ग्रामउद्योग परत सुरू करताना त्यांनी चरखा, बांबूच्या वस्तु निर्मिती, मधुमक्षिका पालन, घोंगडी तयार करने, मातीची भांडी, चामड्याच्या तयार वस्तु, कोंबडी पालन असे उद्योग सुरू करता शकतात. यामुळे रोजगार निर्मिती होण्यास मदत मिळून गावे स्वावलंबी बनतील.यातूनच देशाचा विकास होईल.

3. देशी उद्योगांना संरक्षण व यांत्रिकीकरण

औद्योगिकरणामुळे गावातील उद्योगधंदे,व्यवसाय यावर अन्याय झाला आहे,असे गांधीजींना वाटते, सार्वजनिक उपयोगाच्या कामासाठी लागणाऱ्या भारी यंत्रासामग्रीचे स्थान अटळ आहे, परंतु ती लोकहितार्थ वापरली पाहिजे.

4. स्वदेशी धोरण

गांधीजींची स्वदेशीची कल्पना खूप महत्त्वाची आहे. आपल्याच देशात आपल्याच व्यक्तींनी तयार केलेल्या वस्तूंचा वापर आपण करणे म्हणजे स्वदेशी होय. या धोरणाचे पालन केल्यामुळेच आपल्याच देशातील व्यक्तींना रोजगार उपलब्ध होतो. आणि आपल्याच देशातील व्यक्तींना रोजगार उपलब्ध होतो आणि आपल्या गावातील पैसा आपल्या गावात रहाण्याची प्रक्रिया पूर्ण होते.म्हणून गांधीजी नेहमी स्वदेशीचा आग्रह धरतात.

जागतिकीकरणानंतर सध्या जी लाट आलेली आहे,त्या लाटेत आपला देश जागतिकीकरणाची ध्येय-धोरणे स्वीकारत पुढे आला. अर्थात ती काळाची गरज होती आणि आहे.परंतु त्यांचा मूळ उद्देश

देशाचा विकास करणे हा होता आणि आहे.आज भारताने आर्थिक क्षेत्रात स्वावलंबी होण्यासाठी जी आत्मनिर्भर योजना स्वीकारली आहे., त्या योजनेचा मुख्य गाभा गांधीजींच्या या विचारांमध्ये सापडतो.

**निष्कर्ष**

वसुधैव कुटुंबकम ही आपल्या भारतीय संस्कृतीची शिकवण आहे. १९९१-९२ च्या सुमारास भारताने जागतिक व्यापार संघटनेच्या करारावर सही केली आणि भारतीयांना व्यापाराचे विश्व मोकळे झाले. त्याचबरोबर व्यापारपेठ काही अपवाद वगळता पुर्णपणे खुली केली. मात्र त्याच वेळेस आपण दुसऱ्या देशांवर अवलंबून राहू लागलो. नेमका याचाच फायदा चीनने घेतला आणि अनेक क्षेत्रांमध्ये एकाधिकार सुरू झाला. आजही तो कायम आहे. मे २०२० मध्ये भारतात आत्मनिर्भरतेचा नारा दिला आणि सर्व जगाचे लक्ष त्याकडे लागले परंतु तो विषय बऱ्यापैकी जुना आहे. महात्मा गांधींनी स्वदेशी आणि खेड्याची समृद्धता असा संदेश स्वातंत्र्यपूर्व काळातच दिला होता. स्वदेशी याच संकल्पनेला आता नव्या रूपात आणले जाणे काळाची गरज आहे,त्यालाच आत्मनिर्भर भारत म्हंटले तर वावगे ठरणार नाही.

**संदर्भ**

1. Bobad Bhujang- Globlization and Insight of Gandhi's thought,AAyushi International Journal, ISSN-2349-638x,Special issue- 69.
2. Sayyad Nisar Karin- The Immoratal thoughts of Mahatma Gandhi Applicable in 21st centuary, AAyushi International Journal, ISSN-2349-638x,Special issue- 69.
3. भुटे बालाजी- 21 वी सदी मे महात्मा गांधी के विचारों की प्रासंगिकता
4. भारती पाटील- गांधी अभ्यास केंद्र,शिवाजी विद्यापीठ कार्यशाळा
5. सातुलिंग गौड- जागतिकीकरण आणि खेड्यांकडे चला, AAyushi International Journal, ISSN-2349-638x,Special issue- 69.
6. तरुण भारत लेख- स्वदेशी आणि मेक इन इंडिया मधून आत्मनिर्भर भारताचे बिजांकुरण, 14 ऑगस्ट २०२०, तरुण भारत.